ISSN 2348- 5825

International Registered &Recognized Research
Journal Related to Higher Education for all Subjects

# Indo Asian Philosopher

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - II, Issue - III, Vol. - II April 2014 To Sept. 2014



EDITOR IN CHIEF
DR. BALAJI KAMBLE

Scanned with CamScanner

प्रा· संग्राम आले

ISSN 2348- 5825

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects

# INDO ASIAN PHILOSOPHER

REFERRED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Vol. II, Issue : III

Year- II, Bi-Annual(Half Yearly)

(April 2014 To Sept. 2014)

**Editorial Office :**

'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Website**

www.irasg.com

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

**E-mail :**

visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**

**Indo Asian Publication,**
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

**EDITOR IN CHIEF**

Dr. Balaji Kamble
Research guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur (M.S.) India

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Karamsingh Rajput
Head, Dept. of Economics,
Lokmanya Tilak College,
Vani, Dist. Yavatmal (M.S.)

Dr. Suresh Dhake
Head, Dept. of Economics,
S. N. D. T. College,
Dongar Katore, Dist. Jalgaon (M.S.)

**DEPUTY EDITOR**

Dr. Kusum Kashyap
Dept. of Botany,
Government College,
Chattarpur (M.P.)

Dr. M. G. Babare
Head, Dept. of Zoology
A. S. C. College,
Naldurg, Dist. Osmanabad (M.S.)

**CO - EDITOR**

Dr. Arun R. Kumbhar
Head, Dept. of Economics,
Arts & Comm. College,
Nesri, Dist. Kolhapur (M.S.)

Dr. S. S. Sawant
Head, Dept. of Hindi,
Welingdon College,
Sangli, Dist. Sangli (M.S.)

**MEMBER OF EDITORIAL BOARD**

Dr. Balasaheb S. Patil
Head, Dept. of Economics,
C. K. T. College,
Panvel, Dist. Raigarh (M.S.)

Dr. Mohmmad T. Rahaman
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

Prakash Randive
Dept. of Social Work,
SCSIBER,
Kolhapur, Dist. Kolhapur (M. S.)

Dr. Sivvappa Rasapali
Dept. of Chemistry,
UMASS, Dartmouth,
MA (United States)

D. G. Chigalikar
Dept. of Economics,
Arts, Comm. Sci. College,
Gadhinglaj, Dist. Kolhapur(M. S.)

Dr. Dilip R. Jagtap
Dept. of Economics,
G. T. Patil College,
Nandurbar, Dist. Nandurbar(M.S.)

Dr. Kiran Khandare
Dept. of English,
Shivaji College,
Akola, Dist. Akola ( M.S. )

Omprakash Madansure
Head, Dept. of Sanskrit,
Rajarshi Shahu College,
Latur, Dist. Latur (M.S.)

Dr. P. M. Band
Dept. of Dept. of Chemistry,
College of Eng. & Technology,
Babhulgaon, Dist. Akola (M. S.)

Dr. Govind Chaudari
Dept. of Commerce,
Pansare College,
Arjapur, Dist. Nanded (M.S.)

Scanned with CamScanner

Vol. II, Issue : III
IAP
Half yearly Research Journal
ISSN 2348-5825
April 2014 To Sept. 2014

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Study on Symptomatology of Fungal Leaf Spot Diseases of Sorghum Occurring in Marathwada (M.S.) India | Dr. M. G. Fawde | 1-7 |
| 2 | Trends in Human Resource Development | Dr. P. T. Pawar | 8-11 |
| 3 | Railway Transport - Issues and Remedies | Dr. Dileep S. Arjune | 12-16 |
| 4 | Black Money & Tax Structure of India | Dr. Balaji G. Kamble | 17-26 |
| 5 | Dr. Babasaheb Ambedkar: The Thinker of Modern Indian | V. C. Bhalerao | 27-30 |
| 6 | शिवप्रसाद सिंह का कथा साहित्य को योगदान | नीता डाके | 31-35 |
| 7 | हालावादी काव्य में मस्ती | चव्हान बबन भोजा | 36-38 |
| 8 | भारतातील बॅंकिंग क्षेत्राच्या वाटचालीचा अभ्यास | डॉ. टी. के. जाधव | 39-45 |
| 9 | महाराष्ट्रातील सार्वजनिक क्षेत्रातील प्रवाशी रस्ते वाहतूक व्यवस्थापन - आव्हाने व संधी | डॉ. शिवराज पाटील | 46-48 |
| 10 | शाळाबाह्य मुलींचे सामाजिक अध्ययन | मीना भगवानराव बोर्डे, | 49-51 |
| 11 | अमरावती जिल्ह्यातील साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास | ए. बी. दोडे,<br>डॉ. एस. एस. जाधव | 52-55 |
| 12 | भारतातील शास्त्रीय संगीतात स्त्रियांची भूमिका | अनिरुद्ध मुकुंद खरे | 56-59 |
| 13 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सांगितीक दृष्टीकोन | उमेश एस.चापके | 60-65 |
| 14 | मधुकरराव चौधरी यांचे तटस्थ समग्र राजकीय विचार काळाची गरज | संजय वामनराव भोळे | 66-70 |

ISSN 2348-5825
Indo Asian Philosopher (IAP)
Vol. II, Issue : III
April 2014 To Sept. 2014
www.irasg.com

Research Paper 14 Political Science

# मधुकरराव चौधरी यांचे तटस्थ समग्र राजकीय विचार काळाची गरज

**संजय वामनराव भोळे**
राज्यशास्त्र विभाग,
अप्पासाहेब र.भा. गरुड महाविद्यालय,
शेंदुर्णी, जि. जळगाव

**प्रास्ताविक :-**

मधुकरराव चौधरी हे एक दृष्टे राजकारणी म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात ओळखले जातात. महाराष्ट्राच्या राजकारणात मधुकरराव चौधरी यांची प्रतिमा आजही एक तटस्थ भुमीका घेउन कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याला निःपक्षभुमीकेतून पाहणारा सच्चा राजकारणी म्हणून आहे. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात प्रदीर्घ काळ सक्रीय सहभाग नोंदवून केवळ स्वार्थी व सत्ताभिलाषी राजकारण मधुकरराव चौधरी यांनी कधीच केले नाही. याचे अनेक उदाहरणे महाराष्ट्राच्या राजकारणात सापडतात.

मधुकरराव चौधरी यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील संपूर्ण वाटचाल ही विचाराला कृतीची जोड देणारी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात मधुकरराव चौधरी यांना म.गांधी, आचार्य विनोबा भावे, साने गुरूजी व देशाच्या राजकारणातील तत्कालीन व्यासंगी व त्यागी नेते डॉ.राजेंद्र प्रसाद, पं.जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांचा सहवास लाभला आणि समाजातील तळागाळातील लोकांसाठी आपण काम करायचे अशी त्यांची भुमीका झाली. आणि पुढे आयुष्यभर देशसेवेसाठी मधुकरराव चौधरी यांनी म.गांधी,आचार्य विनोबा भावे यांच्या विचाराला समोर ठेवून कार्य केले म्हणून आजच्या काळात मधुकरराव चौधरी यांची वैचारीक व्यासंगी राजकीय दृष्टी व त्यागी राजकारणी म्हणून असलेली प्रतीमा आजच्या राजकारणाच्या व राजकीय नेत्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे दिसते.

**शोध निबंधाची उद्दीष्टे :-**

१. मधुकरराव चौधरी यांच्या समग्र राजकीय विचारातील राजकीय नितीमत्तेचा आढावा
२. मधुकरराव चौधरी यांची त्यागमय कारकीर्द दर्शविणे
३. मधुकरराव चौधरी आणि म.गांधी,विनोबा भावे यांची वैचारीक भुमीका स्पष्ट करणे.
४. महाराष्ट्राच्या राजकारणातील मधुकरराव चौधरी यांची निपक्षपाती भुमीका स्पष्ट करणे.



Scanned with CamScanner

५. केवळ सत्ताभिलाषी नव्हेतर समाज उपयोगी व विकासात्मक कृती करणारा नेता म्हणून मधुकरराव
चौधरी यांच्या कार्याची ओळख करून देणे.

६. विरोधी पक्षातील नेत्यांचा मार्गदर्शक नेता म्हणून मधुकरराव चौधरी यांची भुमिका स्पष्ट करणे.

**मधुकरराव चौधरी यांचा जीवन वृतांत व जडणघडण :-**

मधुकरराव चौधरी यांचा जन्म स्वातंत्र्य लढ्यातील काळात धनाजीनाना चौधरी व आई सरस्वतीबाई चौधरी यांच्या उदरी १६ जून १९२८ रोजी नाशिक येथे झाला. चौधरी कुटूंबातील दुरदृष्टीचे नेतृत्व म्हणून त्या काळात नाना रावजी यांना ओळखले जात होते. स्वातंत्र्य लढ्यात अग्रभागी असलेल्या या चौधरी कुटूंबाने मधुकरराव चौधरी यांच्यावर राष्ट्रसेवा व स्वावलंबनाचा संस्कार जन्मापासुनच घडविला होता.

मधुकरराव चौधरी यांचा जन्म झाला त्यावेळी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यासाठी मा.गांधी, पं.नेहरू,डॉ.राजेंद्र प्रसाद हे जनतेला साद घालत होते. याच काळात मधुकरराव चौधरी यांचे वडील धनाजीनाना चौधरी यांनी ब्रिटीशांच्या सेवेत असलेली उच्चपदस्थ नोकरी सोडून भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला आणि मधुकरराव चौधरी यांच्यावर कळत नकळत या विचारांचा प्रभाव झाला.

चौधरी कुटूंब मुळचे खानदेशातील रहीवाशी होते. खिरोदा जि.जळगांव या गावात मधुकरराव चौधरी यांचे बालपण गेले. १९३१ साली खिरोदा जि.जळगांव येथे स्वराज्य आश्रमाची स्थापना धनाजी नाना चौधरी व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी केली व स्वदेशीला चालना देणारा विचार या आश्रामातून सुरू झाला,खादी विणकाम, रंगकाम,सुतकताई यांची सुरूवात येथे झाली व स्वातंत्र्य लढ्यात हा परिसर अग्रभागी असल्यामुळे २७ डिसेंबर १९३६ साली राष्ट्रीय काँग्रेसने ग्रामिण भागातील अधिवेशन घ्यायचे ठरविले व फैजपुर जि.जळगांव या गावाची निवड झाली व हे अधिवेशन पार पडले. याच अधिवेशनाच्या निमीत्ताने म.गांधी,आचार्य विनोबा भावे, पं.नेहरू , डॉ.राजेंद्र प्रसाद,साने गुरूजी यांचा सहवास याच भूमीत बालपणी मधुकरराव चौधरी यांना लाभला व मधुकरराव चौधरी यांना एक चांगली वैचारीक दृष्टी मिळाली पुढे त्यांचे कार्य यांच्या प्रभातूनच झाले.

**मधुकरराव चौधरी यांचा सर्वोदयी व स्वदेशी विचार-**

मधुकरराव चौधरी हे बालपणीच म.गांधी,आचार्य विनोबा भावे यांच्या विचाराने प्रभावित झाल्यामुळे पुढे मोठेपणी त्यांची त्यागी वृत्ती म.गांधी,आचार्य विनोबा भावे,सानेगुरूजी यांच्या विचाराची उपासक ठरली व म.गांधींजीच्या मृत्युनंतर वयाच्या १९ व्या वर्षी म्हणजे १९४८ साली मधुकरराव चौधरी यांनी एक प्रतिज्ञा केली व आयुष्यभर स्वदेशी,खादी या तत्वाची जोपासना करेन असे ठरविले.

मधुकरराव चौधरी यांचा सर्वोदयी विचार सुद्धा आचार्य विनोबा भावे यांच्या सहवासातुन मधुकरराव चौधरी यांनी घेतला व समाजाच्या कल्याणसाठी आपणही काहीतरी केले पाहीजे यादृष्टीने त्यांनी पुढील वाटचाल केल्याची दिसते.

**मधुकरराव चौधरी यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील भुमीका व कार्य-**

**मधुकरराव चौधरी यांचा राजकीय प्रवेश :-**

मधुकरराव चौधरी यांचा राजकीय प्रवेशाचा काळ म्हणजे १९५४-५५ हा होता. धनाजीनानांच्या कार्यामुळे चौधरी घराण्याला कॉग्रेसनिष्ठ मानले जात होते आणि धनाजीनाना यांच्या मृत्युनंतर कॉंग्रेस



Scanned with CamScanner

नेत्यामध्ये एक सहानुभुतीची लाट होती. या बरोबरच मधुकरराव चौधरी यांनी सर्वोदयाचे कार्य हाती घेतल्यामुळे त्यांची वैचारीक जडण-घडण सर्वांनाच चांगली वाटत होती. समाजवादाचाही त्यांच्यावर प्रभाव होता.

यासर्व घडामोडीतून १९५७ साली यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकारातून महाराष्ट्राच्या विधानसभेत खानदेशमधुन मधुकरराव चौधरी यांना संधी मिळाली व प्रचंड बहुमतांनी त्यांचा विजयही झाला.

**महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील मधुकरराव चौधरी यांचे कार्य :-**

मधुकरराव चौधरी यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात काम करतांना प्रदीर्घ काळ म्हणजे २१ वर्षाच्या काळात १३ प्रशासकीय विभागाची धुरा यशस्वीपणे सांभाळून यशस्वीपणे समाजाची सेवा केली व आपली प्रतीमा जनसामान्यात निस्पृश्य व त्यागी नेता म्हणून निर्माण केली याची प्रचीती त्यांच्या अनेक कार्यातून दिसून येते.

**उर्जा आणि पाटबंधारे मंत्री :-**

या खात्याच्या माध्यमातून काम करतांना मधुकरराव चौधरी यांनी इरिगेश दरबार ही संकल्पना अस्तित्वात आणुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी अधिकारी वर्ग व शेतकरी यांच्यात समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शासकीय कामातून चांगली राजकीय प्रतिमा निर्माण करता येते हे त्यांनी दाखवून दिले.

याच काळात महाराष्ट्र-गुजरात या दोन राज्यातील तापी खोऱ्यातील पाणी वाटपाचा प्रश्न त्यांनी कुशलतेने सोडविला व महाराष्ट्राला न्याय मिळवून दिला. ही त्यांच्या कामाची कुशल हातोटी होती या कार्यामुळे त्यांना लोकसेवक म्हणून ओळखतात.

**उत्कृष्ट पालकमंत्री :-**

मधुकरराव चौधरी यांनी जळगांव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून उत्कृष्ट काम केले. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी जनता दरबार ही संकल्पना राबवून लोकांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य दिला.

**महसून उपमंत्री :-**

महाराष्ट्र निर्मीतीनंतर मधुकरराव चौधरी यांना महसुल उपमंत्रीपद दिले व त्याकाळात दलीतांना पडीक जमीन मिळवून देण्यासाठी मधुकरराव चौधरी यांनी अथक परिश्रम घेतले व हा कार्यक्रम यशस्वी केला. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी मधुकरराव चौधरी हे दिशादर्शक नेतृत्व आहे असे उद्गार काढले व राजकारणाला मधुकररावांसारख्यांची गरज आहे असे सांगितले.

**नगर विकास मंत्री :-**

नगरविकास मंत्री झाल्यानंतर मधुकरराव चौधरी यांनी शहरीकरणाच्या वाढत्या प्रमाणाला थांबवण्यासाठी व या समस्या सोडविण्यासाठी Bombay Metropolitan Regional Development Authority ची स्थापना केली व परंतु अल्पकाळ हा विभाग त्यांकडे असल्यामुळे ते फारसे योगदान देउ शकले नाहीत.

**आरोग्य विभाग, कॅबीनेट मंत्री :-**

आरोग्यमंत्री असतांना मधुकरराव चौधरी यांनी आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न केला. हॉस्पीटल्सला जोडून नेत्रपीढ्याची स्थापना केली, वैद्यकीय अधिकाऱ्यांना नविन संशोधनाला चालना



Scanned with CamScanner

दिली. त्यासाठी आयुर्वेद शब्दकोश तयार करू घेतला.

**उत्कृष्ट शिक्षणमंत्री :-**

मधुकरराव चौधरी हे शिक्षकमित्र शिक्षणमंत्री म्हणून ओळखले जातात.शिक्षण हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. मधुकरराव चौधरी म्हणत की शिक्षक चिंतामुक्त झाला की आपोआपच शिक्षण चिंतामुक्त होईल. यासाठी त्यांनी उत्कृष्ट कार्य केल्याचे दिसून येते. त्यामध्ये पुणे येथील माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना,शिक्षकांचे पगार,वेतश्रेणी,सेवासुरक्षा,निवृत्तीवेतन इ. च्या समस्या त्यांनी मार्गी लावल्या.

शिक्षणविषयक श्वेतपत्रिका तयार केली या सर्व उत्कृष्ट कार्यामुळे त्यांना २००४ साली नाशिक येथील अधिवेशनात शिक्षणरत्न पदवी देउन गौरविण्यात आले.

याबरोबरच मधुकरराव चौधरी यांनी अर्थ व नियोजन,सांस्कृतीक खाते,नगरविकास मंत्री,युवककल्याण व क्रिडामंत्री,महसुल व पुनर्वसनमंत्री म्हणून उत्कृष्ट कामगिरी केल्याचे दिसते.

**विधानसभा अध्यक्ष :-**

मधुकरराव चौधरी हे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी व्यक्तीमत्व असणारे व त्यागमय वृत्ती असणारे नेते म्हणून ओळखले जात असत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य विधान सभा अध्यक्ष म्हणून २१ मार्च १९९० साली मधुकरराव चौधरी यांची प्रचंड मतांनी निवड झाली आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील १९९० ते १९९५ हा काळ यशस्वी विधानसभा अध्यक्षांचा काळ म्हणून ओळखला जातो.

मधुकरराव चौधरी यांनी विधानसभा अध्यक्ष म्हणून काम करतांना तटस्थ भुमिकेतूनच आपले निर्णय घेतले व विरोधी पक्षातील कोणत्याही सदस्याला मधुकरराव चौधरी यांच्या कडून अन्याय सहन करावा लागला नाही. हे त्यांचे खास वैशीष्ट्ये होते.

**निष्कर्ष -**

अंतीमतः मधुकरराव चौधरी यांच्या राजकीय कार्याबद्दल मत स्पष्ट करतांना असे म्हणता येत की, मधुकरराव चौधरी हे जनसामान्यात वावरणारे व सत्तेचा गैरवापर कधीच न करणारे राजकीय सेवक होते. आपली प्रतीमा मल्लीन होणार नाही याचा त्यांनी आयुष्यभर विचार करून महाराष्ट्रातील सामान्य जनतेसाठी अनमोल कार्य केले. मधुकरराव चौधरी यांच्या कार्याबद्दल टिका करतांना विरोधकही क्षणभर विचार करत असत आणि विरोधीपक्षाच्या दृष्टीने मधुकरराव चौधरी हे मार्गदर्शक व आदराचे स्थान असणारे नेते होते असे दिसते. म्हणजेच महाराष्ट्रातील आजच्या बऱ्याचनेत्यांना मधुकरराव चौधरी यांनी खरी दिशा दिली व अनमोल मार्गदर्शन केले. पण महाराष्ट्राच्या आजच्या राजकारणात मुल्यनिरपेक्षता मोठ्याप्रमाणत दिसून येते. त्यादृष्टीने यांचे तटस्थ समग्र राजकीय विचार आजच्या काळाची गरज असल्याचे दिसून येते.

Scanned with CamScanner

## संदर्भ सूची :-


१) चौधरी प्रभात - लोकसेवक बाळासाहेब मधुकरराव चौधरी १६ जून २००७ मुंबई

२) पाटील अशोक रामराव - मधुकरराव उर्फ बाळासाहेब चौधरी लघुसंशोधन प्रबंध (नागपुर) १९८३-८४

३) कामत डॉ. अशोक - ना.मधुकरराव चौधरी शैक्षणीक जीवन कथा प्रकाशक गुरूकुल प्रतिष्ठाण,पुणे डिसेंबर २००६

४) भालेराव अ.फ. - लोकहितैषी बाळासाहेब मधुकरराव चौधरी अंकुर प्रकाशन,अकोला जूलै-२०११

५) चौधरी मधुकर धनाजी - प्रतिज्ञा १९ फेब्रुवारी १९४८

६) चौधरी भानु - कर्मयोगी धनाजीनाना तथा दादासाहेब चौधरी जीवन व कार्य २५ डिसेंबर १९७२

७. चौधरी भानु - पू.भाउसाहेब बोंडे एक समर्पित जीवन जनता शिक्षण मंडळ, खिरोदा २१ डिसेंबर २००६

८) चौधरी शिरीष - गौरवांजली लोकसेवक बाळासाहेब मधुकरराव चौधरी गौरवग्रंथ मुंबई १६ जून २००७

९) मधुकरराव चौधरी - मुलाखत १६ डिसेंबर २००७

१०) मधुकरराव चौधरी - मुलाखत ३ एप्रील २००८

११) मधुकरराव चौधरी - मुलाखत १२ जूलै २००९

१२) महाराष्ट्रविधी मंडळ - महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्तव नोंदी प्रकाशक महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव समिति विधानभवन मुंबई - २०११

१३) रामप्रधान - यशवंतराव चव्हाण :- शब्दांचे सामर्थ्य प्रकाशक-यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण मुंबई-२०००


**Typing Font : 1) Marathi / Hindi :- Pagemaker,ISM DVB-TTYogesh,(Font Size-14)**
**2) English :- Pagemaker,Times New Roman,(Font Size-12)**



Scanned with CamScanner

INDO ASIAN PHILOSOPHER

ISSN 2348- 5825

ISSN 2348-5825

Published, Printed, Owned by Sow. Mahananda B. Kamble & Edited by Dr. Balaji Kamble & Printed at Indo Vision Offset, Binding & Published by Indo Asian Publication Pvt. Ltd., 'Gyandev -Parvati', R-9/ 139/6, Near Vishal School, L.I.C. Colony, Pragati Nagar, Latur. Dist. Latur-413531 (M.S.) India.

**Editor In Chief : Dr. Balaji Kamble Mob.-9503814000**

Scanned with CamScanner